तक्रार यु.एल.पी.क्र.६३/२०२०. निशाणी क्र.यु—९ पुर्ववत.

**<u>पुढील सरतपास तक्रारदाराचे विधीज्ञ श्री. पी. एन. वर्मा यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** :—

१२. मी शपथेवर कथन करतो की प्रतिज्ञापत्रात नमुद मजकुर माझ्या माहीतीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. मी यादी निशाणी क्र. यु—२ सोबत कागदपत्र दाखल केले आहेत. वि. प. यांच्या विधीज्ञानी सदरचे कागदपत्र मान्य केले म्हणुन दस्तऐवज क्र. १ ते ६ यांना **<u>निशाणी क्र. यु—१० ते यु—१५ अनुक्रमे</u>** देण्यात येत आहे.

**<u>उलटतपास वि. प. यांचे विधीज्ञ श्री. एस. एस. सासनकर यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** :—

१३. मी १९९८ साली वि. प. महामंडळात सेवेत रूजु झालो. नियत वयोमर्यादेनुसार मी सेवानिवृत्त झालेलो आहे. माझ्या शपथपत्रातील मजकुर मला माहीती आहे. माझ्या उजव्या पायाचा अपघात झाला होता. अपघातानंतर मला वाहन चालविता येत नव्हते. वि. प. यांनी मला शिपाई पदाची पर्यायी नोकरी दिली होती.

<u>पुढील उलटतपासासाठी तहकुब</u>.

स्वाक्षरी/—
( एस. एस. खांडेकर )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, अकोला.

दिनांक :— ०७/०४/२०२६.

*अ.तु.बागडे/—*